॥ एक फुलले फूल आणी फुलुन नुसते राहिले ॥

गीतः ग. दि. माडगुळकर

एक फुलले फूल आणी, फुलुन नुसते राहिले
त्या कुणी न पाहिले, त्या कुणी न पाहिले ॥ धृ. ॥

मंद अगदी गंध त्याचा, मंद इवले डोलणे
साधले न मुळी तयाला, नटुनी थटुनी नाचणे।
कोवळे काळीज त्याचे, परि कुणी से मोहिले
त्या कुणी न पाहिले, त्या कुणी न पाहिले ॥ १ ॥

त्या फुलाला काय ठावी, या फुलाची आवडी,
तो न आला या दिशेला, वाट करुनी वाकडी।
या फुलाला मात्र दिसली दुरुन त्याची पावले
त्या कुणी न पाहिले, त्या कुणी न पाहिले ॥ २ ॥

एक दुसरे फूल त्याने पुढुन हाती घेतले,
या फुलाचे जळुन गेले, भाव उभरे आतले।
करपली वेडी अबोली दुःख तेची राहिले
त्या कुणी न पाहिले, त्या कुणी न पाहिले ॥ ३ ॥